# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रेसनोट

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पश्चिम येथे मांडली तलाव असून सदर तलाव तसेच तलावा शेजारी उद्यानाचे बांधकाम सन 1992 मध्ये पुर्ण केलेले आहे. सदर तलावा शेजारी नगरभवन ही इमारत देखिल 1994 मध्ये बांधुन वापरास सुरु करण्यात आली आहे.

सदर तलाव व इमारत बांधकामास 33 वर्षे झाल्याने त्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. तलावाच्या भिंती हया दगडाच्या असल्याने सदर भिंतीची पुर्नबांधणी करणे, तलावातील गाळ काढणे इ. कामासाठी कंत्राटदार यांना कार्यादेश देऊन काम सुरू करण्यात आले आहे. दि.14/05/2025 रोजी सदर तलावाची एक दगडी भिंत पडल्याने त्वरीत आवश्यक उपाययोजना करून सदर भिंतीचे मंजूर अंदाजपत्रकानुसार कामास सुरूवात करण्यात आली आहे. तथापी प्रत्यक्षात काम करतांना कंत्राटदारामार्फत सुरक्षेच्या उपाययोजना करून योग्य काळजी न घेतल्याने त्यांचेकडून रू.5.00 लक्ष दंड वसुल करण्याचे मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी आदेश दिले आहेत. सदर तलावातील भिंतीचे काम हे वेगाने सुरू करण्यात आले असून दि.07 जुन, 2025 पर्यंत पुर्ण करण्यात येणार आहे.

( दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका